# १२. महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया

**अण्णा भाऊ साठे** (१९२०-१९६९) : लोकशाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार.

'वारणेचा वाघ', 'फकिरा', 'रूपा', 'गुलाम', 'चंदन', 'मथुरा', 'चिखलातील कमळ', 'रानगंगा', 'माकडीचा माळ', 'वैजयंता', 'वैर', 'पाझर', 'चित्रा', 'आग', 'अहंकार', 'आवडी', 'गुऱ्हाळ' इ. कादंबऱ्या; 'चिरानगरची भुतं', 'निखारा', 'पिसाळलेला माणूस', 'फरारी', 'कृष्णाकाठच्या कथा', 'गजाआड' इत्यादी कथासंग्रह; 'इनामदार', 'पेंग्याचं लगीन', 'सुलतान' ही नाटके; 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन प्रसिद्ध.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या ओघवत्या लोकभाषेतून प्रस्तुत काव्यरचना केली आहे. महाराष्ट्रावरील त्यांचे प्रेम शब्दाशब्दांतून व्यक्त होते. प्रस्तुत कविता ही 'कविता व माझा रशियाचा प्रवास' या पुस्तकातून घेतली आहे.



कंबर बांधून ऊठ घाव झेलाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

महाराष्ट्र मंदिरापुढती । पाजळे याशीची ज्योती
सुवर्ण धरा खालती । निल अंबर भरले वरती
गड पुढे पोवाडे गाती । भूषवी तिला महारथी
तो अरबी सागर लागे जयाचे पाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

ही मायभूमि धीरांची । शासनकर्त्या वीरांची
घामाची आणि श्रमाची । खुरप्याची आणि दोरीची
संतांची, शाहीरांची । त्यागाच्या तलवारीची
स्मरून धुरंधर आता त्या शिवराया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

पहा पर्व पातले आजचे । संयुक्त महाराष्ट्राचे
साकार स्वप्न करण्याचे । करी कंकण बांधून साचे
पर्वत उलथून यत्नाचे । सांधू या खंड की त्याचे
या सत्यास्तव मैदानि शिंग फुंकाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

धर ध्वजा करी ऐक्याची । मनीषा जी महाराष्ट्राची
पाऊले टाक हिंमतीची । कणखर जणु पोलादाची
घे आण स्वातंत्र्याची । महाराष्ट्रास्तव लढण्याची
उपकार फेडुनी जन्मभूमीचे जाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

## स्वाध्याय

**प्र. १. वैशिष्ट्ये लिहा.**

(अ) **महाराष्ट्राची सांस्कृतिक वैशिष्ट्ये**

(आ) **कवितेत आलेली महाराष्ट्र भूमीतील व्यक्तिवैशिष्ट्ये**

**प्र. २. असत्य विधान ओळखा.**

(१) धुरंधर शिवरायांना स्मरावे.
(२) असत्यास्तव शिंग फुंकावे.
(३) स्वातंत्र्याची आण घ्यावी.
(४) जन्मभूमीचे उपकार फेडावे.

**प्र. ३. कवितेतून व्यक्त झालेली 'महाराष्ट्राबद्दलची कृतज्ञता' हा विचार स्पष्ट करा.**

**प्र. ४. महाराष्ट्राची बलस्थाने तुमच्या शब्दांत सांगा.**

**प्र. ५. काव्यसौंदर्य.**

(अ) 'धर ध्वजा करी ऐक्याची । मनीषा जी महाराष्ट्राची' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य लिहा.

(आ) कवितेतून व्यक्त होणाऱ्या रसाचे तुमच्या शब्दांत सोदाहरण वर्णन करा.

**प्र. ६. अभिव्यक्ती.**

(अ) तुम्हांला जाणवलेल्या महाराष्ट्रातील अभिमानास्पद बाबींचे वर्णन करा.

FH1XXI

## भाषाभ्यास

**वृत्तांतील लघुगुरूक्रम ठरवण्याचे काही नियम आहेत.**

(१) 'पुस्तक' या शब्दांतील लघुक्रम (–∪∪) असा आहे, कारण 'पु' हे अक्षर लघू असले, तरी पुढच्या 'स्त' या जोडाक्षराचा आघात मागील लघु स्वरावर येतो. त्यामुळे त्याच्या २ मात्रा धराव्या लागतात. जर असा आघात येत नसेल, तर जे अक्षर ऱ्हस्व आहे ते ऱ्हस्वच राहते.

(२) जोडाक्षरातील शेवटचा वर्ण ऱ्हस्व असेल, तर ते जोडाक्षर ऱ्हस्व मानावे.
उदा., भास्कर (–∪∪) दीर्घ असेल, तर दीर्घ उदा., इच्छा (––).

(३) लघु अक्षरावर अनुस्वार येत असेल किंवा त्यानंतर विसर्ग येत असेल तर ते गुरू मानावे.
उदा., नंतर (–∪∪) दु:खी (––).

(४) कवितेच्या चरणातील शेवटचे अक्षर लघू असले तरी दीर्घ उच्चारले जाते. त्यामुळे ते गुरू किंवा दोन मात्रांचे मानतात.

मराठी पद्यरचनेत अक्षरवृत्ते, छंदवृत्ते, मात्रावृत्ते किंवा जातिवृत्ते असे तीन प्रकार आढळतात.

| अक्षरवृत्ते | छंदवृत्ते | मात्रावृत्ते |
|---|---|---|
| प्रत्येक चरणातील अक्षरांची संख्या सारखी, लघुगुरूक्रमसुद्धा सारखा असतो. | चरणातील अक्षरांची संख्या समान असते; पण लघुगुरूक्रम नसतो. | अक्षरांची संख्या सारखी नसते; पण मात्रांची संख्या मात्र सारखी असते. |